आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१८ एप्रिल २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज संस्थगित

- विरोधकांनी केवळ राजकीय हेतूनं १३१ वी दुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर होऊ दिलं नाही अशी सरकारची टीका, तर हे विधेयक नामंजूर होणं हा विरोधी पक्ष, राज्यघटना आणि देशाचा विजय असल्याचं काँग्रेसचं प्रतिपादन

- वार्षिक हज यात्रेसाठी यात्रेकरुंचा पहिला जत्था दिल्लीहून रवाना

- जागतिक वारसा दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना दिल्ली कॅपिटल्सबरोबर तर दुसरी लढत सनरायझर्स हैद्राबाद आणि चेन्नई सुपरकिंग्ज यांच्यात रंगणार

<><><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं असून विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशन आज संस्थगित झालं. २८ जानेवारीला या अधिवेशनाला सुरुवात झाली होती.

या अधिवेशनात लोकसभेच्या एकूण ४१ बैठका झाल्या, यात ९३ टक्के कामकाज झालं असं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं. अधिवेशनात बारा विधेयकं सभागृहात सादर झाली, यातली ९ विधेयकं मंजूूर झाली. यात वित्त विधेयक २०२६, नादारी कायदे सुधारणा विधेयक २०२५, आंध्रप्रदेश पुुनर्रचना विधेयक २०२६, जनविश्वास तरतुदींमधली सुधारणा विधेयक २०२६ आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल सामान्य प्रशासन विधेयक २०२६ या विधेयकांचा समावेश आहे.

राज्यसभेचं कामकाज १५७ तास चाललं, या अधिवेशनात सदस्यांनी आपलं मूल्यवान मत मांडून सभागृहातल्या चर्चेचा स्तर उंचावला असे गौरवोद्गार राज्यसभा अध्यक्ष सीपी राधाकृष्णन यांनी काढले. राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश यांची फेरनिवडही या अधिवेशनात झाली.

**<><><><><>**

लोकसभा आणि राज्य विधानसभांमधे महिला आरक्षणाच्या अनुषंगाने मांडलेलं संविधानाची १३१ वी दुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर होऊ शकलं नाही. यासाठी झालेल्या विशेष अधिवेशनात ५२८ सदस्यांनी मतदान केलं. त्यापैकी विधेयकाच्या बाजूने २९८ मतं, तर विरोधात २३० मतं पडली. घटना दुरुस्ती विधेयक संमत होण्यासाठी दोन तृतीयांश मतांची आवश्यकता असते. तेवढी मतं मिळाली नसल्याने हे विधेयक मंजूर झालं नसल्याचं सभापीत ओम बिरला यांनी जाहीर केलं.

दरम्यान, या विधेयकाशी संबंधित मतदारसंघ पुनर्रचना विधेयक २०२६, आणि केंद्रशासित प्रदेश कायदे सुधारणा विधेयक २०२६ मागे घेत असल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रीजीजू यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

१३१ वी घटनादुरुस्ती विधेयक, लोकसभा मतदार संघ पुनर्रचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा विधेयक ही तीन विधेयकं लोकसभेत गेल्या गुरुवारी मांडण्यात आली होती. महिलांना लोकप्रतिनिधीगृहात ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या नारी शक्ती वंदन अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी २०२६च्या जनगणनेवर आधारित पुनर्रचना करायची झाल्यास, २०२९च्या लोकसभा निवडणुकीत महिलांना आरक्षण मिळालं नसतं म्हणून हे विधेयक मांडलं होतं. मात्र विरोधकांनी केवळ राजकीय हेतूने ते मंजूर होऊ दिलं नाही, अशी प्रतिक्रया संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी याबाबत काँग्रेसवर महिलाविरोधी असल्याची टीका केली.

**.... होल्ड- बाईट- अन्नपूर्णा देवी...**

**<><><><><>**

१३१ व्या घटनादुरुस्तीचं विधेयक हे महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी होतं, त्यामुळे हे विधेयक नामंजूर होणं हा विरोधी पक्ष, राज्यघटना आणि देशाचा विजय आहे, असं काँग्रेस महासचिव खासदार प्रियंका गांधी यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होत्या.

**- - होल्ड बाईट प्रियांका - -**

या विधेयकाबद्दल विरोधी पक्षांना काहीही माहीत नव्हतं, केवळ एक दिवस आधी विधेयकाचा मसुदा दिला गेला, देशाच्या संघराज्य रचनेला बदलणं आणि लोकशाहीला कमकुवत करण्यासाठीचं हे षड्यंत्र होतं अशी टीका गांधी यांनी केली. हे विधेयक मंजूर झालं असतं तर जातनिहाय जनगणनेची गरज पडली नसती, त्यामुळे सरकारला मनमानी करण्याची संधी मिळाली असती असा आरोपही त्यांनी केला. २०२३ ला मंजूर झालेलं महिला आरक्षण विधेयक तात्काळ लागू करा अशी मागणीही प्रियांका गांधी यांनी केली.

**<><><><><>**

३७१ यात्रेकरुंचा पहिला जत्था सौदी अरेबियातल्या मेक्का यात्रेसाठी आज दिल्लीहून रवाना झाला. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून हे यात्रेकरू यात्रेसाठी निघाले. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाचे सचिव डॉ. श्रीवत्स कृष्णा यांनी यात्रेकरूंच्या या पहिल्या विमानाला हिरवा झेंडा दाखवला. त्यांनी यात्रेकरूंना सुखरूप यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार हज यात्रेकरूंच्या सुकर प्रवासासाठी सर्व प्रयत्न करत असल्याचं दिल्ली हज समितीच्या अध्यक्ष कौसर जहान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आज जागतिक वारसा दिन. सांस्कृतिक, नैसर्गिक वारशाची विविधता जपण्यासंदर्भात जागरूकता वाढावी यासाठी हा दिवस आज जगभरात साजरा केला जातो. तसंच ऐतिहासिक स्मारकं आणि स्थळांच्या संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी देखील हा दिवस 'आंतरराष्ट्रीय स्मारकं आणि स्थळं दिन' म्हणूनही साजरा केला जातो. 'संघर्ष आणि आपत्तीच्या काळात ऐतिहासिक वास्तूंच्या संरक्षणासाठी आपत्कालीन प्रतिसाद' अशी या दिनाची यंदा संकल्पना आहे. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

**.... व्हॉईस कास्ट-**

देशाचं सांस्कृतिक रूप अनेक पुरातन स्मारकं, वस्तू आणि ऐतिहासिक स्थळांनी नटलेलं आहे. या वास्तू आणि वस्तू केवळ भूतकाळाचे अवशेष नाहीत तर तो एक सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. गेल्या दशकभरात देशाच्या सांस्कृतिक संपत्तीचं रक्षण

करण्यावर नव्यानं भर दिला गेला आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागातर्फे ३ हजार ६८६ संरक्षित स्मारकांचं जतन केलं जातं. मोठ्या प्रमाणात डिजिटायझेशन, राष्ट्रीय वारसा डेटाबेसची निर्मिती, दस्तऐवजीकरण आणि संवर्धनासाठी वैज्ञानिक आणि डिजिटल साधनांचा व्यापक अवलंब करत असल्यानं वारसा आणि स्मारकांच्या जतनकार्यात वेगानं प्रगती होत आहे. युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेली ४४ स्थळं देशात आहेत. मराठा इतिहासातल्या १२ किल्ल्यांचा यात समावेश झाला आहे. सरकारनं व्यापक सांस्कृतिक आणि वारसा परिसंस्थेमध्ये विशेषतः डिजिटायझेशन, दस्तऐवजीकरण आणि सांस्कृतिक मालमत्तेची सुरक्षितता यांसारख्या क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करायला सुरुवात केली आहे. हस्तलिखितं, दस्तावेज संरक्षित करण्यासाठी एआयचा मोठ्या प्रमाणात वापर सुरु केला आहे.

लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी जागतिक वारसा दिनाबद्दल देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भारताची भूमी नेहमीच ऐतिहासिक गौरवशाली परंपरा, स्थापत्यकलेचा अविष्कार आणि सांस्कृतिक विविधतेनं परिपूर्ण राहिली आहे, त्याचं जतन केलं पाहिजे, असं ओम बिरला यांनी समाज माध्यमांवरून शुभेच्छा देताना म्हटलं आहे.

केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी नागरिकांना या दिनाच्या शुभेच्छा देताना ऐतिहासिक स्थळं, मंदिरं तसंच प्राचीन किल्ल्यावरच्या भिंती, परिसर स्वच्छ ठेवण्याचं आणि त्यांचं जतन करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना दिल्ली कॅपिटल्सबरोबर होणार आहे. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडीयमवर दुपारी साडेतीनवाजता सामन्याला सुरुवात होईल.

आजचा दुसरा सामना हैद्राबादच्या राजीव गांधी स्टेडीयमवर सनरायझर्स हैद्राबाद आणि चेन्नई सुपरकिंग्ज यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता होणार आहे.

अहमदाबादमधे काल झालेल्या सामन्यात शुभमन गिलच्या शानदार अर्धशतकी खेळीमुळे गुजरात टायटन्सने कोलकाता नाईट रायडर्सवर ५ गडी राखून विजय मिळवला.

**//<><><><><>//**